# सिडकोची महागृहनिर्माण योजना

सिडकोने महाराष्ट्रातील लाखो लोकांच्या घराच्या आकांक्षा पूर्ण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सिडकोने गेल्या काही वर्षांत विविध दूरदर्शी धोरणे, डिजिटल आणि तंत्रज्ञानातील प्रगती इत्यादींच्या मदतीने संबंधित सर्व भागधारकांचा सहभाग सुनिश्चित केला व प्रधानमंत्री आवास योजनेसाठी (पीएमएवाय) पुढाकार घेऊन या योजनेचा लाभ पात्र कुटुंबांपर्यंत पोहोचवला आहे.

जगातील सर्वात मोठी महागृहनिर्माण योजना या वैशिष्ट्यांसोबतच या योजनेचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे ही बहुतेक घरे 'ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट' (टीओडी) तथा गतिमान प्रवास सुलभतेच्या संकल्पनेनुसार विकसित केली आहेत. या वैशिष्ट्यांमुळे नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात सुलभता येण्यासोबतच, प्रवासाच्या वेळेची व पैशाची बचत करण्याच्या उद्देशानेच ही घरे रेल्वे स्थानके, बस स्थानके व मेट्रो स्थानकांच्या जवळ विकसित केली आहेत.

अत्याधुनिक प्रीकास्ट, हरित आणि बांधकामातील प्रगत नवतंत्रज्ञानाने बांधल्याने या घरांचा गुणवत्तेचा दर्जा देखील उत्कृष्ट आहे. याशिवाय बांधकाम जलदगतीने पूर्ण होण्यासोबतच या इमारती मजबूत व टिकाऊही आहेत. या गृहप्रकल्पाच्या बांधणीसाठी वापरलेले अन्य संबंधित घटक, सफाईदार फिनिशिंग इ.साठी देखील दर्जेदार उत्पादनांचाच वापर करून बळकट बांधकामाशी समतोल साधला आहे. सिडकोकडे असलेल्या तंत्रकुशल मनुष्यबळामुळे अनेक व्यापक उद्दिष्टांची पूर्तता करण्याची अद्वितीय क्षमता लाभली आहे.



## मा. अध्यक्षांचा शुभसंदेश

सिडकोतर्फे 26,000 घरांची महागृहनिर्माण योजना पुन्हा एकदा सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्यासाठी सादर करण्यात आली आहे. यामुळे दसरा, दिवाळी या सणासुदीच्या काळातील नागरिकांचा आनंद निश्चित द्विगुणीत होणार आहे. 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या नावाने ही महागृहनिर्माण योजना जाहीर करण्यात आली आहे. योजनेच्या नावानुसार अर्जदारांना सदनिकांकरिता पसंतीक्रम देण्याचा पर्याय उपलब्ध असणार आहे. नवी मुंबईतील खारघर, खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसर, मानसरोवर, पनवेल, तळोजा व उलवे नोडमध्ये सदर घरे (सदनिका) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) व अल्प उत्पन्न गट (LIG) यांच्याकरिता उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

सिडकोने आपल्या स्थापनेपासून विविध आर्थिक उत्पन्न गटांतील नागरिकांना परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. सिडकोने नवी मुंबईमध्ये आजवर 1,50,000 हून अधिक घरे बांधून लक्षावधी कुटुंबांना हक्काचे घर मिळवून दिले आहे. परवडणारा दर, गुणवत्तापूर्ण बांधकाम आणि सर्व सुविधांनी युक्त गृहसंकुले, हे सिडकोच्या गृहनिर्माण योजनांच्या यशाचे गमक आहे.

सिडकोतर्फे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत 67,000 घरे बांधण्यात येत आहेत. यापैकी पहिल्या टप्प्यात 26,000 घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नैना शहर इ. महत्त्वाच्या प्रकल्पांमुळे नवी मुंबईच्या विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. तसेच परिवहन सुविधांनी देखील हे शहर परिपूर्ण आहे. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरात घर घेण्याची संधी या महागृहनिर्माण योजेद्वारे नागरिकांनी उपलब्ध झाली आहे. तरी अधिकाधिक नागरिकांना या संधीचा लाभ घ्यावा.

**श्री. संजय शिरसाठ**
अध्यक्ष, सिडको



## उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांचा शुभसंदेश

सिडकोतर्फे 11 ऑक्टोबर 2024 रोजी दसऱ्याच्या पूर्वसंध्येला 26,000 घरांच्या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला. सिडकोतर्फे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमध्ये 67,000 घरे (सदनिका) बांधण्यात येत आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यात 26,000 घरांकरिता 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या नावाने ही गृहनिर्माण योजना जाहीर करण्यात आली आहे. सदरची घरे ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांकरिता नवी मुंबईतील खारघर, खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसर, मानसरोवर, पनवेल, तळोजा व उलवे नोडमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहेत. नावाप्रमाणेच या योजने अंतर्गत अर्जदारांना सदनिकांकरिता पसंतीक्रम (Order of Preference) देण्याचा पर्याय उपलब्ध असणार आहे.

विविध उत्पन्न गटांकरिता परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्याबाबत सिडको नेहमीच अग्रेसर आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतील घरांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने सिडकोची वाटचाल वेगाने सुरू आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना जलद गतीने घरे उपलब्ध करून देणे शक्य होत आहे. पारदर्शक ऑनलाइन अर्ज प्रक्रियेमुळे सिडकोच्या गृहनिर्माण योजनांची विश्वासार्हता अधिक वाढीस लागली आहे.

या महागृहनिर्माण योजनेचे तीन टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात अर्ज नोंदणी व कागदपत्रे सादर करणे, दुसऱ्या टप्प्यात बुकिंगच्या रकमेचा भरणा व सदनिकांकरिता पसंतीक्रम देणे आणि तिसऱ्या टप्प्यात सोडतीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यामुळे अर्जदारांना सुलभरीत्या अर्ज नोंदणी करणे शक्य होणार आहे. नवी मुंबईसारख्या पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असलेल्या शहरात घर घेण्याची संधी या योजनेद्वारे चालून आली आहे. तरी अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा.


श्री. विजय सिंघल

उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

# अनुक्रमणिका


| क्रमांक | विषय | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | प्रकल्प व महारेरा तपशील | ६- ७ |
| २ | सिडकोची महागृहनिर्माण योजना - गट | ८ |
| ३ | पात्रता निकष | ९ |
| ४ | सर्वसाधारण अटी | ११ |
| ५ | ऑनलाईन नोंदणी (ई-केवायसी) प्रक्रिया | १२ |
| ६ | बुकिंगची पद्धत | १५ |
| ७ | परिशिष्ट I (कागदपत्रे) | १७ |
| ८ | फॉर्म/प्रतिज्ञापत्र | १८ |

# सिडको महागृहनिर्माण योजना
# ऑक्टोबर 2024

| क्रमांक | नोड | सदनिका प्रकार | सदनिकांचे चटईक्षेत्र (चौ.फु.) | सदनिकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | तळोजा, सेक्टर-28 | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | 322 | 2185 |
| 2 | तळोजा, सेक्टर-39 | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | 322 | 7509 |
| 3 | खारघर बस डेपो | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | 322 | 1700 |
| 4 | खारकोपर 2ए | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | 322 | 288 |
| 5 | खारकोपर 2बी | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | 322 | 288 |
| 6 | कळंबोली बस डेपो | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | 322 | 1360 |
| 7 | बामनडोंगरी | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | 322 | 1700 |
| 8 | तळोजा, सेक्टर- 37 | अल्प उत्पन्न गट ए | 398 | 816 |
| 9 | तळोजा, सेक्टर- 37 | अल्प उत्पन्न गट बी | 540 | 8 |
| 10 | नवीन पनवेल (प.) बस टर्मिनस | अल्प उत्पन्न गट | 322 | 172 |
| 11 | खारघर बस टर्मिनस | अल्प उत्पन्न गट | 322 | 340 |
| 12 | मानसरोवर रेल्वे स्टेशन | अल्प उत्पन्न गट | 322 | 840 |
| 13 | खांदेश्वर रेल्वे स्टेशन | अल्प उत्पन्न गट | 322 | 1470 |
| 14 | खारकोपर-भूखंड क्र. 3, सेक्टर-16 ए | अल्प उत्पन्न गट | 322 | 2113 |
| 15 | वाशी ट्रक टर्मिनल | अल्प उत्पन्न गट | 322 | 3131 |
| 16 | खारघर स्टेशन | अल्प उत्पन्न गट बी | 540 | 1803 |

# प्रकल्प तपशील -महारेरा

| | | | |
|---|---|---|---|
| तळोजा सेक्टर २८<br>P52000028287 | तळोजा सेक्टर ३९<br>P52000045446 | खारघर बस डेपो<br>P52000028196 | खारकोपर २ए<br>P52000033704 |
| खारकोपर २बी<br>P52000033705 | कळंबोली बस डेपो<br>P52000028183 | बामनडोंगरी<br>P52000028209 | तळोजा सेक्टर ३७<br>P52000028240 |
| पनवेल (प)<br>बस टर्मिनस<br>P52000028195 | खारघर<br>बस टर्मिनस<br>P52000028204 | मानसरोवर रेल्वे स्टेशन<br>P52000030419 | खांदेश्वर रेल्वे स्टेशन<br>P52000028246 |
| खारकोपर-भूखंड क्र. 3,<br>सेक्टर-16 ए<br>P52000033542 | वाशी ट्रक टर्मिनस<br>P51700030100 | खारघर स्टेशन<br>P52000032944 | |

https://maharera.maharashtra.gov.in/

# सिडको महागृहनिर्माण योजना-गट

ही योजना 'सर्वांसाठी घर' या संकल्पनेवर आधारित आहे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि कमी उत्पन्न असलेल्या समाजघटांना निश्चित किंमतीत परवडणारी घरे उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. योजनेत दोन आर्थिक गट समाविष्ट आहेत –

## 1. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस)

I. ज्या अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ ६ लाखांपर्यंत असेल, तो आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटातील असेल.

II. अर्जदाराचे वय अर्ज नोंदणीच्या वेळी १८ वर्षे किंवा त्याहून अधिक असावे.

III. अर्जदार किंवा त्यांचा/तिचा पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांना भारतात पक्के घर असू नये.

IV. अर्जदाराचे महाराष्ट्र राज्यात १५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळ वास्तव्य असावे.

सरकारकडून ₹ 2.5 लाखांचे अनुदान लागू आहे. यामध्ये रु. 1.5 लाख केंद्र सरकारकडून आणि रु. 1 लाख राज्य सरकारकडून दिले जातील.
कृपया लक्षात घ्यावे, जर सह-अर्जदाराने (पत्नी, आई, आश्रित इ.) यापूर्वीच सरकारी अनुदानाचा लाभ घेतला असेल, तर अर्जदाराला सरकारच्या अनुदानाचा लाभ घेता येणार नाही.

## 2. अल्प उत्पन्न गट (एलआयजी)

I. ज्या अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ ६ लाखांपेक्षा जास्त असेल, तो अल्प उत्पन्न गटातील आहे.

II. अर्जदाराचे वय अर्ज नोंदणीच्या वेळी १८ वर्षे किंवा त्याहून अधिक असावे.

III. अर्जदार किंवा त्यांचा/तिचा पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांच्या नावावर नवी मुंबईत घर नसावे.

IV. अर्जदाराचे महाराष्ट्र राज्यात १५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळ वास्तव्य असावे.

# पात्रता निकष

अर्जनोंदणीच्या तारखेला, अर्जदाराचे वय 18 वर्षे किंवा त्याहून अधिक असावे. पुढील गटांवर आधारित,

१. गटाच्या आधारे:

अ. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी, अर्जदारांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ 6,00,000/- (सहा लाख रुपये) पर्यंत असावे. 'कौटुंबिक वार्षिक उत्पन्न' म्हणजे अर्जदार आणि त्याच्या/तिच्या पती/पत्नीसोबतच्या मागील 12 सलग महिन्यांतील एकत्रित वार्षिक उत्पन्नाची गणना.

ब. अल्प उत्पन्न गटासाठी, अर्जदारांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ 6 लाखांपेक्षा अधिक असावे. LIG श्रेणीसाठी कोणतीही उत्पन्न मर्यादा नाही.

उत्पन्नाचा पुरावा (मूलभूत वेतन + महागाई भत्ता (DA) + CAA + सर्व प्रकारचे भत्ते (वैद्यकीय/धुलाई/शिक्षण/प्रवास/कॅन्टीन/HRA वगळता) + विशेष भत्ते + बोनस + ओव्हरटाइम याचा विचार केला जाईल.)

1. कुटुंबातील सर्व सदस्यांचे आर्थिक वर्ष 2023-2024चे आयकर रिटर्न (ITR) तपशीलात्मक असावेत. (आयकर रिटर्नचे एकच पान विचारात घेतले जाणार नाही.) किंवा
2. तहसीलदाराने दिलेले मागील तीन आर्थिक वर्षांचे उत्पन्न प्रमाणपत्र, किंवा
3. मागील 12 महिन्यांच्या वेतन पावत्या, किंवा
4. नियोक्त्याची (Employer) स्वाक्षरी असलेले उत्पन्न प्रमाणपत्र, किंवा
5. नियोक्त्याकडून (Employer) नियमित वेतन जमा झालेल्या बँक स्टेटमेंट्सची स्कॅन केलेली प्रत, किंवा
6. जर सह-अर्जदार कमावता नसेल तर, तसे घोषणापत्र जमा करणे आवश्यक आहे. (कृपया फॉर्म G बघावा)

२. घराची मालकी,

अ. अर्जदार किंवा त्यांचा/तिचा पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांचे भारतात पक्के घर नसावे.

ब. अर्जदार किंवा त्यांचा/तिचा पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांच्या नावावर नवी मुंबईत घर नसावे.

३. अधिवास प्रमाणपत्र (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटांसाठी): अर्जदाराचे महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही भागात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे. अधिवास प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अधिवास प्रमाणपत्र जुने असल्यास अर्जदाराला त्याचे बारकोडसह नूतनीकरण करणे आवश्यक आहे (माजी सैनिकांसाठी ही अट शिथील करण्यात आली आहे).

४. सामाजिक दर्जा निकष (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट या दोन्ही गटांसाठी):

अ. संवैधानिक आरक्षित प्रवर्ग:

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती | ११.०% |
| अनुसूचित जमाती | ६.०% |
| भटक्या जमाती | १.५% |
| विमुक्त जमाती | १.५% |

जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक त्या स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे.

ब. दिव्यांग (शारीरिक विकलांग) – 5% आरक्षण

क. गैर-संवैधानिक प्रवर्ग (लागू असल्यास):

सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेअंतर्गत गैर-संवैधानिक प्रवर्गासाठी आरक्षण खालीलप्रमाणे:

| | **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक** | **अल्प उत्पन्न गट** |
|---|---|---|
| प्रकल्पग्रस | ५.०% | २.५०% |
| माथाडी | ५.०% | २.५०% |
| राज्य/ शासकीय कमर्मचारी | १.०% | ०.५०% |
| माजी सैनिक | १.५०% | १.५०% |
| धार्मिक अल्पसंख्याक | २.५०% | २.५०% |
| पत्रकार | १.०% | १.०% |
| सिडको कर्मचारी | नाही | ०.५०% |

कृपया नोंद घ्यावी, या पुस्तिकेतील परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेले सर्वप्रकारचे संबंधित प्रमाणपत्रे / कागदपत्रे योग्य स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे.

# सर्वसाधारण अटी

विवाहित अर्जदारांसाठी सह-अर्जदार म्हणून पती/ पत्नी असणे अनिवार्य आहे. जर पुरुष अर्जदार अविवाहित असेल तर आई सह-अर्जदार असू शकते. जर पहिला अर्जदार महिला असेल, तर सह-अर्जदार ऐच्छिक आहे. लक्षात असू द्या की अर्जदार एकल/ अविवाहित असल्यास तसे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

अ. पीएमएवाय योजनेसाठी अर्ज करणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटासाठी:

I. पीएमएवाय प्रमाणपत्र (जर अर्जदाराला शासकीय अनुदान घ्यायचे असेल) - अर्जदारांनी केंद्र सरकारच्या वेबसाइटवर https://pmaymis.gov.in किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोंदणी केलेली असावी.

II. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटामधील कुटुंबात प्रौढ महिला सदस्य नसल्यास, अर्ज फक्त पुरुष सदस्यांच्या नावावरच करता येईल.

III. दि. 09/12/2022 च्या संचालक मंडळ ठराव क्र. 12633 अनुसार करार झाल्याच्या तारखेपासून 5 वर्षांच्या कालावधीत सदनिका विकता किंवा हस्तांतरित करता येणार नाही. आरक्षित प्रवर्गातील अर्जदारांना ताबा मिळाल्यानंतर 5 वर्षांनंतर, सदनिका फक्त समान आरक्षण प्रवर्गातील व्यक्ती/व्यक्तींना हस्तांतरित करता येईल, यासाठी महामंडळाकडून लेखी परवानगी आणि हस्तांतरणाच्या वेळी लागू असलेल्या शुल्काची रक्कम भरावी लागेल.

IV. चुकीच्या नावाने केलेले अर्ज किंवा यापूर्वी पीएमएवायचा लाभ घेतलेल्या अर्जदारांचे अर्ज रद्द केले/ नाकारले जातील.

ब. अल्प उत्पन्न गटासाठी: करार झाल्यानंतर 3 वर्षांच्या कालावधीपर्यंत सदनिका विकता किंवा हस्तांतरित करता येणार नाही. आरक्षित गटासाठी, ताबा मिळाल्यानंतर 3 वर्षांनंतर, सदनिका फक्त समान आरक्षण गटातील व्यक्तीलाच हस्तांतरित करता येईल, यासाठी महामंडळाकडून लेखी परवानगी आणि हस्तांतरणाच्या वेळी लागू असलेल्या शुल्काची रक्कम भरावी लागेल.

# ऑनलाईन नोंदणी (ई-केवायसी) प्रक्रिया:

अर्जदारांना https://www.cidcohomes.com या संकेतस्थळावरून किंवा 'CIDCO HOMES' या मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन अर्ज करता येईल.

नोंदणीच्या वेळी अर्जदाराने खालील माहिती तयार ठेवावी:

- आधार क्रमांक आणि आधार कार्डची स्वसाक्षांकित प्रत/प्रतिमा (jpg/ png/ pdf स्वरूपात - कमाल आकार 2MB)
- पॅन कार्ड आणि त्याची स्वसाक्षांकित प्रत/प्रतिमा (jpg/ png/ pdf स्वरूपात - कमाल आकार 2MB)
- मोबाईल क्रमांक (आधार कार्डशी लिंक असणारा)
- ईमेल आयडी
- सह-अर्जदाराचे तपशील (लागू असल्यास)
- परिशिष्ट I मध्ये नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे
- अर्जदार व सह-अर्जदारांची अलिकडील छायाचित्रे

## पद्धत:

**पहिला टप्पा: अर्जदाराचे साईन-अप**

- www.cidcohomes.com या संकेतस्थळावर नोंदणी करा.
- तुमचे पूर्ण नाव आणि मोबाइल क्रमांक प्रविष्ट करा, त्यानंतर त्या मोबाईल क्रमांकावर एक लॉगिन OTP पाठवला जाईल. ग्राहकाने OTP प्रविष्ट करावा आणि खाते तयार करावे.

**दुसरा टप्पा: ई-केवायसीची पडताळणी**

- खाते तयार झाल्यानंतर, ग्राहकाने त्यांचा आधार नंबर प्रविष्ट करावा. आधारशी जोडलेल्या मोबाइल क्रमांकावर एक OTP प्राप्त होईल. ग्राहकाने त्यांच्या आधार पडताळणीसाठी तो OTP प्रविष्ट करावा.
- आधार प्रमाणित झाल्यानंतर, ग्राहकाने आपला स्थायी खाते क्रमांक (पॅन) प्रविष्ट करावा. पॅनची पडताळणी डिजिट पद्धतीने होईल.

**तिसरा टप्पा: अर्जदाराचे तपशील**

- तुमचा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गट किंवा अल्प उत्पन्न गट निवडून, तुमचे मासिक कौटुंबिक उत्पन्न आणि तुमच्या मालकीच्या घराचे तपशील द्या.

- वैयक्तिक तपशील भरा, जसे... तुमचा व्हॉट्सअॅप क्रमांक (हे ऐच्छिक आहे, परंतु सर्वप्रकारचे महत्त्वाचे अपडेट्स मिळवण्यासाठी तो प्रविष्ट करण्याचा सल्ला दिला जातो), वैवाहिक स्थिती, संपर्क पत्ता (तुमचा वर्तमानातील पत्ता) आणि सक्रिय ई-मेल आयडी. ई-मेल आयडीवर एक OTP पाठविला जाईल, ग्राहकाने ई-मेल आयडीवर प्राप्त झालेला OTP प्रविष्ट करावा आणि त्याची पडताळणी करावी. आगामी काळात योजनेशी संबंधित विविध संवाद आणि अपडेट्स मिळवण्यासाठी आवश्यक.
- तुमच्या सह-आवेदकाची माहिती प्रविष्ट करून, त्यांचे आधार आणि PAN कार्ड अपलोड करा, जे त्यांच्या द्वारे स्व-प्रमाणित केलेले असावे.
- योग्य प्रवर्ग निवडा.

**अ. संवैधानिक प्रवर्ग:**

महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून जात व जात वैधता प्रमाणपत्र स्वसाक्षांकित स्वरूपात सादर करणे अनिवार्य आहे. इतर राज्यांतून जारी केलेली जात प्रमाणपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

I. अनुसूचित जाती

II. अनुसूचित जमाती

III. अधिसूचित जमाती

IV. विमुक्त जमाती

**ब.** दिव्यांग प्रमाणपत्र दिव्यांग व्यक्तीं हक्क अधिनियम 2016 च्या अनुषंगाने सक्षम प्राधिकरणाकडून जारी केलेले असावे, ज्यामध्ये अर्जदाराने दिव्यांग (PH) प्रवर्गाचा दावा केलेला आहे हे प्रमाणित करणे आवश्यक आहे. यामध्ये अंधत्व, कमी दृष्टी, कुष्ठरोगातून बरे झालेले, ऐकण्याची क्षमता गमावलेले, अस्थि-चालकताविषयक अपंगत्व, मानसिक मंदता, ऑटिझम, मानसिक आजार, विशिष्ट शिकण्यासंबंधी अपंगत्व, बौद्धिक अपंगत्व या गोष्टींचा समावेश आहे. पात्रतेसाठी किमान 40% अपंगत्व असणे आवश्यक आहे.

**क. गैर-संवैधानिक प्रवर्ग:** सक्षम प्राधिकाऱ्याचे वैध प्रमाणपत्र आवश्यक आहे.

I. राज्य सरकारी (महाराष्ट्र शासनाद्वारे नियंत्रित सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, महापालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषद कर्मचारी इ.) – फॉर्म C प्रमाणपत्र अधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह शासकीय विभागाच्या लेटरहेडवर आवश्यक आहे.

II. सिडको कर्मचारी- सिडकोच्या लेटरहेडवर अधिकृत अधिकाऱ्याच्या सही आणि स्टीकरसह फॉर्म सी प्रमाणपत्र.

टीप: CIDCO च्या कर्मचाऱ्यांना केवळ LIG / LIG-A / LIG-B गटांत अर्ज करणे शक्य आहे.

III. पत्रकार – सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी (PRO) यांनी जारी केलेले प्रमाणपत्र आणि फॉर्म D: पत्रकारांचे घोषणापत्र

IV. धार्मिक अल्पसंख्याक - शाळा सोडल्याचा दाखला आणि फॉर्म E: धार्मिक अल्पसंख्याक असल्याचे नोटरीकृत शपथपत्र

V. महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त व्यक्ती - मेट्रो सेंटर/संबंधित विभागाद्वारे जारी केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, निवाडा प्रती आणि 7/12 उतारा तसेच प्रकल्पग्रस्त कुटुंबवृक्षाचे शपथपत्र (वंशावळ) आवश्यक आहे.

VI. माजी सैनिक आणि त्यांचे आश्रित तसेच निमलष्करी दल (भूदल, नौदल, वायूदल, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय औद्योगिक सुराक्षा दल,आयटीबीपी, एनएसजी, आसाम रायफल्स आणि एसएसबी) आणि त्यांचे आश्रित - माजी सैनिकांचे ओळखपत्र/सेवा दस्तावेज पुस्तक/जिल्हा सैन्य मंडळ किंवा संबंधित संरक्षण प्राधिकरणांनी दिलेले प्रमाणपत्र.

VII. माथाडी कामगार - माथाडी बोर्डाचे प्रमाणपत्र (केवळ मुंबई महानगर क्षेत्रासाठी)

**चौथा टप्पा: कागदपत्र अपलोड करा:**

• सर्व आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित स्कॅन केलेल्या प्रती jpg/png/pdf स्वरूपात असाव्यात, त्यांचा आकार 2MB च्या आत असावा. (निवास प्रमाणपत्रासाठी बारकोड दस्तऐवज अनिवार्य आहे.)

• अर्ज केलेल्या श्रेणी अंतर्गत सर्व नोंदणीकृत प्रतिज्ञापत्र अपलोड करणे आवश्यक आहे.

• करारावर स्वाक्षरी करण्याच्या आधी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**पाचवा टप्पा: अर्जाचे शुल्क भरा:**

अर्जदारांना लागू असलेल्या अर्ज शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.

- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गट व अल्प उत्पन्न गट या दोन्ही गटांमध्ये ₹ 236/- (GST सह) शुल्क भरावे लागेल. (अर्ज शुल्क विनापरतावा आहे कृपया याची नोंद घ्यावी) शुल्काचा भरणा पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन केला जाईल.

- अर्जदाराने भरणा करण्यापूर्वी अर्ज अचूक भरलेला आहे याची खात्री करावी. शुल्काचा भरणा केल्यानंतर अर्जदार अर्जात किंवा निवडलेल्या प्रवर्गात बदल करू शकत नाही. अर्जदार 'माय अकाउंट' विभागातून पूर्ण भरलेला अर्ज व देयकाची पावती डाउनलोड करू शकतात.

- कृपया, ऑनलाईन नोंदणीचे शुल्क भरल्यानंतर अर्जदाराला अर्जामध्ये सुधारणा करण्याची संधी मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

# बुकिंगची पद्धत

संपूर्ण अर्ज/नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन आहे, आणि वाटप प्रक्रियाही ऑनलाईन प्रणालीद्वारेच होईल.




- पसंतीची निवड आणि बुकिंग रकमेची विंडो 15 दिवसांसाठी खुली असेल.
- ज्या ग्राहकांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले आहे, त्यांना त्यांच्या पसंती निवडण्यासाठी सूचित केले जाईल. ग्राहक एकूण 15 पसंती निवडू शकतो. त्या 15 पसंतीचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणेः

    - अर्जदार सोडतीच्या तीन फोयांध्ये भाग घेऊ शकतात.
    - प्रत्येक फेरीत ग्राहक त्याच्या किमान 1 (एक) व कमाल 5 (पाच) निवडी देऊ शकतो,
    - निवडलेल्या प्रत्येक प्रकल्प स्थळावरील टॉवर व मजल्यांचे जास्तीत जास्त 5 पसंती निवडू शकतो. कुठल्याही सोडत फेरीमध्ये प्रकल्प स्थळाबाबत कोणतीही मर्यादा नाही, परंतु प्रत्येक फेरीत एकूण 5 पसंतीची मर्यादा आहे.

- पसंती दिल्यानंतर, अर्जदारांना बुकिंग रक्कम भरावी लागेल, ₹75,000/- + GST (आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटासाठी - EWS) किंवा ₹1,50,000/- + GST अल्प उत्पन्न गटासाठी – LIG, 1 BHK पसंतीसाठी), किंवा ₹2,00,000/- + GST, 2 BHK पसंतीसाठी असेल.

- बुकिंग रक्कमेची विंडो बंद झाल्यानंतर, पात्र ग्राहकांची मसुदा यादी प्रसिद्ध केली जाईल. ज्या ग्राहकांची नावे मसुदा यादीत नाहीत ते त्यांच्या हरकती यादी प्रकाशित झाल्यानंतर 7 दिवसांच्या आत त्यांच्या हरकती नोंदवू शकतात.

- हरकतींचे निराकरण हे हरकती नोंदवण्याच्या तारखेनंतरच्या 7 दिवसांत केले जाईल.

- सर्व हरकतींचे निराकरण केल्यानंतर 5 दिवसांनी पात्र ग्राहकांची अंतिम यादी प्रकाशित केली जाईल.

- सोडतीच्या तारखा नंतर जाहीर होतील. सोडतीची अंमलबजावणी झाल्यावर, यशस्वी अर्जदारांची यादी सिडको संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल आणि यशस्वी विजेत्यांना 'इरादा पत्र' (लेटर ऑफ इंटेंट) जारी केले जाईल.

- लॉटरी प्रक्रियेत अपयशी ठरलेल्या ग्राहकांना बुकिंगची रक्कम 30 दिवसांच्या आत परत केली जाईल.

- विजेत्यांना इरादा पत्रात दिलेल्या वेळापत्रकानुसार उर्वरित बुकिंग रक्कम भरण्यासाठी सूचित केले जाईल.

- सर्व विजेत्यांची कागदपत्रे डिजिटल पद्धतीनेच तपासली जातील आणि यशस्वीरीत्या पडताळणी झालेल्या अर्जदारांना नोंदणी पोर्टलवर हप्त्यांच्या वेळापत्रकासह वाटप पत्र दिले जाईल.

- हप्ते यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर कराराची प्रक्रिया सुरु केली जाईल.

- करार प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर घराच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु केली जाईल.

- हस्तांतरणाच्या दिवशी घर घरमालकांना त्यांच्या घराची चावी सुपूर्द केली जाईल

# परिशिष्ट I (कागदपत्रे)

| | |
|---|---|
| सर्व अर्जदारांसाठी अनिवार्य | - अर्जदाराचे आधार कार्ड व आधारशी लिंक असलणारा मोबाईल क्रमांक<br>- अर्जदाराचे पॅन कार्ड<br>- रहिवास प्रमाणपत्र - माजी सैनिकांना सूट (महाराष्ट्रातील कोणत्याही भागात किमान 15 वर्षांचे वास्तव्य) ई-मेल आयडी<br>- अलिकडील छायाचित्र<br>- उत्पन्नाचा पुरावा (मूलभूत वेतन + महागाई भत्ता (DA) + CAA + सर्व प्रकारचे भत्ते (वैद्यकीय/धुलाई/शिक्षण/प्रवास/कॅन्टीन/HRA वगळता) + विशेष भत्ते + बोनस + ओव्हरटाइम याचा विचार केला जाईल.)<br><br>1 कुटुंबातील सर्व सदस्यांचे आर्थिक वर्ष 2023-2024चे आयकर रिटर्न (ITR) तपशीलात्मक असावेत. (आयकर रिटर्नचे एकच पान विचारात घेतले जाणार नाही.)किंवा<br>2 तहसीलदाराने दिलेले मागील तीन आर्थिक वर्षांचे उत्पन्न प्रमाणपत्र, किंवा<br>3 मागील 12 महिन्यांच्या वेतन पावत्या, किंवा<br>4 नियोक्त्याची (Employer) स्वाक्षरी असलेले उत्पन्न प्रमाणपत्र, किंवा<br>5 नियोक्त्याकडून (Employer) नियमित वेतन जमा झालेल्या बँक स्टेटमेंट्सची स्कॅन केलेली प्रत<br>6 जर सह-अर्जदार कमावता नसेल तर, तसे घोषणापत्र जमा करणे आवश्यक आहे. (कृपया फॉर्म G बघावा)<br><br>- सह-अर्जदाराचे आधार कार्ड (लागू असल्यास)<br>- सह-अर्जदाराचे पॅन कार्ड (लागू असल्यास) |

| **वरीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रांव्यतिरिक्त** | |
|---|---|
| गट A - आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस - पीएमएवाय): | - फॉर्म A प्रतिज्ञापत्र : अर्जदार किंवा त्यांचा/त्यांची पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांच्या नावावर भारतात पक्के घर नसावे.<br>- पीएमएवाय प्रमाणपत्र (जर अर्जदाराला शासकीय अनुदान घ्यायचे असल्यास)<br>- अर्जदारांनी केंद्र सरकारच्या https://pmaymis.gov.in या संकेत स्थळावर किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोंदणी केलेली असावी. |
| गट B - अल्प उत्पन्न गट (एलआयजी) | फॉर्म B: प्रतिज्ञापत्र : अर्जदार किंवा त्यांचा/त्यांची पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांच्या नावावर नवी मुंबईमध्ये घर नसावे. |

| | **उप-गट अ – संवैधानिक** |
|---|---|
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ भटक्या जमाती/विमुक्त जमाती: | - सक्षम प्राधिकरणाद्वारे जारी केलेले जात प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>- सक्षम प्राधिकरणाद्वारे जारी केलेले जात पडताळणी प्रमाणपत्र (लागू असल्यास) |

| **दिव्यांग (शारिरीक विकलांग)** | |
|---|---|
| दिव्यांग (शारिरीक विकलांग) | दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016च्या अनुषंगाने सक्षम प्राधिकरणाद्वारे जारी करण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र (अंधत्व, कमी दृष्टि, कुष्ठरोग बरा झालेला, ऐकू येत नसलेले, चालण्यास अक्षम, मानसिक मंदत्व, ऑटिझम, मानसिक रोग, विशिष्ट शिकण्याची अक्षमता, बुद्धिमत्ता अक्षमता - पात्रतेसाठी किमान अक्षमतेची टक्केवारी 40% असावी.) |

| **उप-गट B – गैर-संवैधानिक** | |
|---|---|
| राज्य सरकारी कर्मचारी<br>स्थानिक स्वराज्य संस्था<br>राज्याच्या सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी<br>(किमान 5 वर्षांची सेवा आवश्यक): | सरकारी आस्थापनेच्या लेटरहेडवर फॉर्म C/ कर्मचारी ओळखपत्र |
| सिडको कर्मचारी (संस्थेत किमान 5 वर्ष सेवा कालावधी पूर्ण झालेला असावा) | सिडकोच्या लेटरहेडवर फॉर्म-C/ कर्मचारी ओळखपत्र |
| महाराष्ट्रातील पत्रकार | फॉर्म D: पत्रकारांचे प्रतिज्ञापत्र आणि सिडकोच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी (PRO) दिलेले प्रमाणपत्र |
| धार्मिक अल्पसंख्याक | फॉर्म E: धार्मिक अल्पसंख्याक असल्याचे नोटरीकृत शपथपत्र |
| प्रकल्पग्रस्त व्यक्ती (महाराष्ट्र) | प्रकल्पग्रस्त कुटुंब वृक्षाचे (वंशावळ) प्रतिज्ञापत्र, निवाडा प्रत, 7/12 उतारा किंवा संबंधित विभाग/कार्यालयाकडून जारी करण्यात आलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र |
| माजी सैनिक आणि त्यांचे आश्रित तसेच निमलष्करी दल (पीएमएफ) | ओळखपत्र/सेवेचे कागदपत्र/जिल्हा सैन्य मंडळ किंवा संबंधित प्राधिकरणाकडून जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र |
| माथाडी कामगार | माथाडी बोर्डाचे प्रमाणपत्र (केवळ मुंबई महानगर क्षेत्रासाठी) |

सर्व आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित स्कॅन केलेल्या प्रती jpg/png/pdf स्वरूपात असाव्यात, त्यांचा आकार 2MB च्या आत असावा.
निवास प्रमाणपत्रासाठी बारकोड दस्तऐवज अनिवार्य आहे.

# फॉर्म्स आणि प्रतिज्ञापत्र

## फॉर्म A: आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) अर्जदारांसाठी

₹100/- च्या नोटरीकृत न्यायिकेतर (नॉन-ज्यूडिशियल) स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही अर्जदार श्री/श्रीमती__________________________________________, वय ______ वर्षे,

सध्या पत्ता________________________________________________________येथे राहात असून,

पॅन क्रमांक _______________________________अंतर्गत आयकर भरणा करतो/करतो.

मी/आम्ही प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर मिळवण्यासाठी सदनिकेसाठी अर्ज करीत आहे/आहेत. माझ्या कुटुंबातील सदस्यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

| क्र. | सदस्यांची नावे | अर्जदाराशी नाते | लिंग | वय | आधार क्र. आणि पॅन क्रमांक | ओळखपत्र (इतर) | इतर ओळखपत्र क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |

मी/आम्ही पुढील माहिती सादर करतो/करते की, मी/आम्ही आणि माझे/आमचे वरील नमूद कुटुंब सदस्य हे भारतात कुठेही पक्क्या घराचे मालक नाहीत. मी/आम्ही पुढे जाहीर करतो की आर्थिक वर्ष 2023-24 साठी माझे वार्षिक कुटुंबीय उत्पन्न रू. 6,00,000/- (रुपये सहा लाख फक्त) पेक्षा कमी आहे.
मी/आम्ही पुढे नमूद करतो की, मी/आम्ही सामान्य / अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / भटक्या जमाती / विमुक्त जमाती / अंध किंवा शारीरिक अपंग व्यक्ती (योग्य असल्याचे नमूद करा) यांमध्ये मोडतो/ मोडते.
मी/आम्ही याही गोष्टीचे प्रमाण देतो/ देते की, मी/आम्ही महाराष्ट्र राज्यात किमान 15 वर्षे राहिलो/ राहिले आहे/आहोत.
मी/आम्ही याही गोष्टीचे प्रमाण देतो की वरील दिलेली माहिती खरी व योग्य आहे.
मी/आम्ही पुढे जाहीर करतो, की वरील माहिती चुकीची आढळल्यास भविष्यात होणाऱ्या कोणत्याही कारवाईसाठी मी/आम्ही जबाबदार असेल/असू आणि सिडकोवर कोणतेही दायित्व ठेवणार नाही.
मी/आम्ही पुढे सांगतो की, वरील दिलेली माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास घराचे वाटप रद्द करण्यास माझे/आमचे काहीही आक्षेप नसतील.
मी जाहीर करतो की, मी सदर योजनेचे नियम समजून घेतले आहेत आणि सिडकोच्या या संदर्भातील सर्व नियम/अटींचे पालन करीन.

अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा — तारीख:

नोटरीची स्वाक्षरी / शिक्का — ठिकाण:

## फॉर्म B: अल्प उत्पन्न गट (LIG) अर्जदारांसाठी

₹100/- च्या नोटरीकृत न्यायिकेतर (नॉन-ज्यूडिशियल) स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही अर्जदार श्री/श्रीमती__________________________________________, वय ______ वर्षे,

सध्या पत्ता________________________________________________________येथे राहात असून,

पॅन क्रमांक.________________________________अंतर्गत आयकर भरणा करतो/करतो.

मी ____________ (संस्थेचे नाव) मध्ये कार्यरत आहे आणि ____________ विभागात काम करतो/करते. आर्थिक

वर्ष 2023-24 साठी माझे एकूण वार्षिक कुटुंबीय उत्पन्न ₹ 6,00,001/- (रुपये सहा लाख एक फक्त) पेक्षा जास्त आहे.

मी/आम्ही पुढे नमूद करतो की वरील माहिती पूर्णतः खरी आणि योग्य आहे.
मी जाहीर करतो की, मी सर्वसाधारण / अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / भटक्या जमाती / विमुक्त जमाती / अंध किंवा शारीरिक अपंग व्यक्ती (योग्य असल्याचे नमूद करा) या प्रवर्गाअंतर्गत अर्ज करीत आहे.
मी जाहीर करतो की, माझ्याकडे किंवा माझ्या जोडीदाराकडे नवी मुंबईत कुठेही घर नाही. तसेच, मी किंवा माझ्या पती/पत्नी कोणत्याही नवी मुंबईतील सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्य नाही.
मी/आम्ही याही गोष्टीचे प्रमाण देतो की वरील दिलेली माहिती खरी व योग्य आहे.
मी/आम्ही जाहीर करतो की, वरील माहिती चुकीची आढळल्यास भविष्यात होणाऱ्या कोणत्याही कारवाईसाठी मी/आम्ही जबाबदार असेल/असू आणि सिडकोवर कोणतेही दायित्व ठेवणार नाही.
मी/आम्ही जाहीर करतो की, वरील माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास मी/आम्हाला देण्यात येणाऱ्या/वाटप केलेल्या घराच्या रद्दबातल करण्यात काहीही आक्षेप नसतील.
मी जाहीर करतो की, मी सदर योजनेचे नियम समजून घेतले आहेत आणि सिडकोच्या या संदर्भातील सर्व नियम/अटींचे पालन करीन.

अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा

तारीख:

नोटरीची स्वाक्षरी / शिक्का

ठिकाण:

## फॉर्म C: महाराष्ट्र राज्य सरकारी अधिकारी / कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र – आस्थापनाच्या लेटरहेडवर

हे प्रमाणित करण्यात येते की श्री/श्रीमती __________________________________________हे/या पत्ता_____________________________________________________________________ येथे राहणारे असून, पॅन क्रमांक___________________________________________अंतर्गत आयकर भरणारे आहेत आणि हे/त्या महाराष्ट्र राज्य शासनाच्या या विभागात कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांची नियुक्ती दिनांक_________________रोजी झाली आहे. सध्या ते/त्या__________________________ विभागात_________________या पदावर कार्यरत आहेत.

तारीख:

स्वाक्षरी / अधिकृत सरकारी अधिकाऱ्यांचा शिक्का

ठिकाण:

## फॉर्म D: महाराष्ट्र क्षेत्रातील पत्रकारांसाठी

मी/आम्ही अर्जदार श्री/श्रीमती_________________________________________वय________वर्षे,

पत्ता__________________________________________________________________ येथे

राहणारे असून, पॅन क्रमांक__________________________________________अंतर्गत आयकर

भरणारे आहे/आहेत.

मी महाराष्ट्र क्षेत्रात पत्रकार म्हणून कार्यरत असून, सिडकोचे जनसंपर्क अधिकारी (PRO) यांच्याकडून जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र आणि माझ्या ओळखपत्राची प्रत सादर करणे अनिवार्य असल्याचे मला पूर्णपणे माहित आहे.

मी संपादक/मुख्य लेखक/बातमी संपादक, बातमी लेखक, प्रत चाचक, प्रतिनिधी, व्यंगचित्रकार/ वृत्त छायाचित्रकार, प्रिंट परीक्षक / मुक्त पत्रकार या श्रेणीत एका प्रमुख साप्ताहिक/मासिक किंवा नियतकालिकात किंवा वृत्तपत्र संस्थेशी संबंधित म्हणून समाविष्ट आहे.

तसेच, मी वृत्तपत्र व्यवस्थापन व प्रशासकीय विभागातील कर्मचारी तसेच पर्यवेक्षक किंवा व्यवस्थापन प्रकारात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या या गटात समाविष्ट नाही.
मी/आम्ही पुढे सांगतो की वरील माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास घराचे वाटप रद्द करण्यास कोणताही आक्षेप राहणार नाही.

अर्जदाराची स्वाक्षरी तारीख:

अर्जदाराचे नाव: ठिकाण:

## फॉर्म E: धार्मिक अल्पसंख्याक श्रेणीतील अर्जदारांसाठी

₹100/- च्या नोटरीकृत न्यायिकेतर (नॉन-ज्यूडिशियल) स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही अर्जदार श्री/श्रीमती__________________________________________, वय ______ वर्षे, पत्ता_____________________________________________________________येथे राहात असून, पॅन क्रमांक.______________________________अंतर्गत आयकर भरणा करतो/करतो.

मी धार्मिक अल्पसंख्याक श्रेणीअंतर्गत अर्ज केला आहे, आणि मी मुस्लिम/सिख/ख्रिश्चन/बौद्ध/पारशी/जैन या धार्मिक अल्पसंख्याक म्हणून केंद्र सरकारच्या नॅशनल कमिशन फॉर माइनॉरिटीज ॲक्ट 1992 च्या गॅझेट भाग 2(c) मध्ये अधिसूचित श्रेणीत येतो/येते.

मी/आम्ही पुढे सांगतो की वरील माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास घराचे वाटप रद्द करण्यास कोणताही आक्षेप राहणार नाही.

अर्जदाराची स्वाक्षरी                    तारीख:

अर्जदाराचे नाव:                    ठिकाण:

## फॉर्म F: अविवाहित / एकल अर्जदारांसाठी

₹100/- ची नोटरीकृत न्यायिकेतर (नॉन-ज्यूडिशियल) स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही अर्जदार श्री/श्रीमती ____________________________________________,वय_______वर्षे,

पत्ता_______________________________________________अंतर्गत आयकर भरणारे आहे/आहेत.

पॅन क्रमांक _________________________ अंतर्गत आयकर भरणारे आहे/आहेत.

सत्य प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की मी अविवाहित आहे. मी प्रधानमंत्री अवास योजने अंतर्गत अर्ज भरुन दिला आहे. तरी मला प्रधानमंत्री अवास योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ देण्यास यावा ही विनंती.

### कृपया तुम्ही ज्या गटात अर्ज करू इच्छिता त्या पुढे अशी खुण करा:

☐ मी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) गटातून घरासाठी लाभासाठी अर्ज केला आहे.

☐ मी अल्प उत्पन्न गटा अंतर्गत अर्ज केला आहे.

मी दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास कायद्याप्रमाणे होणाऱ्या कारवाईस मी पूर्णपणे जबाबदार राहील. मी वर नमूद केलेली माहिती माझ्या माहिती आणि समजुती प्रमाणे खरी व बरोबर असून मी माझ्या माहितीने कोणत्या दबावाखाली न येता लिहून देत असून त्याच्या सत्यतेकरिता मी सादर प्रतिज्ञापत्र करत आहे. ती खोटी आढळल्यास त्यास मी भा. द. वि. कलाम 199, 200 व 193 (2) अनव्ये शिक्षेस पात्र राहील. या प्रतिज्ञापत्राचा मजकूर माझ्या मातृभाषेत वाचून दाखविला तो खरा आणि बरोबर आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा — तारीख:

अर्जदाराचे नाव: — ठिकाण:

दिनांक: ___________

# स्वयंघोषणापत्र

(अर्जदार नोकरी/ व्यवसाय करत नसल्यास)

मी श्री./ सौ. ________________________________________,व्यवसाय_______अर्ज,

क्रमांक__________________________क्रमांक__________________________आहे/आहेत.

_________________ वय ____ वर्षे, सदर प्रतिज्ञापत्र असे शपथपूर्वक सांगतो / सांगते की,

मी स्वतः सध्या कोठेही नोकरी करत नाही किंवा कोणताही व्यवसाय करत नाही. त्यामुळे त्यांचे सन 2023-2024 या आर्थिक वर्षाचे उत्पन्न निरंक आहे.

मी यापुढे असे जाहीर करतो की/ करते की, माझ्या परिवारात खालील सदस्य आहेत.

| अ. क्र. | नाव | नाते | व्यवसाय / नोकरीचे उत्पन्न |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |

वर नमूद केलेली माहिती खरी व बरोबर आहे.

मी यापुढे असे कथन करतो/करते की, वर दिलेली माहिती भविष्यात जर चुकीची आढळल्यास होणाऱ्या कारवाईस मी जबाबदार राहिल व सिडको महामंडळास त्याकरिता कोणत्याही प्रकारची तोषीस लागू देणार नाही. त्याचप्रकारे वाटप करण्यात आलेले घर रद्द करण्याबाबत माझी कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही.

सत्यप्रतिज्ञेवर आज दिनांक ______________________ रोजी नवी मुंबई येथे जाहीर केले आहे.

दिनांक : ________________ (अर्जदार)

दिनांक: ___________

# स्वयंघोषणापत्र

(अर्जदाराची पती/ पत्नी नोकरी करीत नसल्यास)

मी श्री./ सौ. _______________________________________,व्यवसाय___________अर्ज,

क्रमांक__________________________राहणार________________________________

_________________वय____वर्षे, सदर प्रतिज्ञापत्र असे शपथपूर्वक सांगतो / सांगते की,

माझे / माझ्या पत्नी / पती श्री./ सौ. __________________________________वय__________ सध्या कोठेही नोकरी करीत नाही किंवा कोणताही व्यवसाय करीत नाही. त्यामुळं त्यांचे सन 2023-2024 या आर्थिक वर्षाचे उत्पन्न निरंक आहे.

मी यापुढे असे जाहीर करतो / करते की, माझ्या परिवारात खालील सदस्य आहेत.

| अ. क्र. | नाव | नाते | व्यवसाय / नोकरीचे उत्पन्न |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |

मी यापुढे असे कथन करतो/करते की, वर दिलेली माहिती भविष्यात जर चुकीची आढळल्यास होणाऱ्या कारवाईस मी जबाबदार राहिल व सिडको महामंडळास त्याकरिता कोणत्याही प्रकारची तोषीस लागू देणार नाही. त्याचप्रकारे वाटप करण्यात आलेले घर रद्द करण्याबाबत माझी कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही.

सत्यप्रतिज्ञेवर आज दिनांक _____________________ रोजी नवी मुंबई येथे जाहीर केले आहे.

दिनांक : _________________ (अर्जदार)

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

**९१ ९९३०८ ७००००** | **भेट द्या** https://cidcohomes.com

अस्वीकरणः येथे दर्शविण्यात आलेल्या/ नमूद केलेल्या सोयी सुविधा, तपशील, पायाभूत सुविधा, छायाचित्रे प्रतिनिधिक आहेत. प्रकल्पाच्या ठिकाणाची, तेथील घरांची / सदनिकांची कल्पना यावी, यासाठी त्यांचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामुळे येथे नमूद केलेल्या गोष्टी आणि वास्तविक परिस्थिती यात बदल असू शकतो, आजूबाजूचा परिसर, अंतर्गत रचना, रंगसंगती, इत्यादी गोष्टींचा केवळ संदर्भ म्हणून उपयोग करण्यात आला आहे. प्रत्यक्षात त्या वेगळ्या असू शकतात किंवा त्यात बदलही झालेला असू शकतो.